माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ-४७७५/२०२३/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे-१

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| दत्तात्रय मधुकर शिवले | ग्रामसेवक , ग्रामपंचायत कार्यालय बकोरी ता. हवेली, जि. पुणे | विस्तार अधिकारी, पचांयत समिती कार्यालय हवेली, ता. हवेली, जि. पुणे |

**<u>व्दितीय अपील सुनावणी दिनांक- ०४- १०-२०२४</u>**

अपिलार्थी यांनी दि.२/८/२०२३ रोजी राज्य माहिती आयुक्त,खंडपीठ पुणे यांचे कडे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करताना उत्तर दिले नाही असे प्रयोजन नमूद केले.

आयोजित सुनावणीस अपिलार्थी हजर आहेत, विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

१. अपिलार्थीचा माहिती अर्ज दिनांक २९/०३/२०२३ रोजीचा आहे. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक , ग्रामपंचायत कार्यालय, बकोरी ता. हवेली, जि. पुणे, यांनी माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केली नाही, असे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते.

१. अपिलार्थीचे प्रथम अपिल दि.२६/०५/२०२३ रोजीचे असुन त्यावर तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पचांयत समिती कार्यालय हवेली, ता. हवेली, जि. पुणे यांनी सुनावणी घेऊन दि ३/७/२०२३ रोजी आदेश दिला असून त्यामध्ये अपिलार्थीस आठ दिवसात टपालाने विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेश जन माहिती अधिकारी श्री.आनंद कांबळे, ग्रामसेवक यांना दिले.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिल आदेशानुसार काहीही कार्यवाही केली नाही.

३. सुनावणीचेवेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे कथन केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय बकोरी ता. हवेली, जि. पुणे, यांनी अपिल आदेशानंतरही माहिती दिली नाही, आजतागायत माहिती दिली नाही.

४. आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने माहिती अर्जात मिळकत उतारा ८-अ चा उतारा मागणी केली होती. अपिलार्थीस माहितीचे प्रदान झालेले नाही.

५. तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केली नाही अपिल आदेशाची अंमलबजावणी केली नाही, त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(२) विस्तार अधिकारी, पचांयत समिती कार्यालय हवेली, ता. हवेली, जि. पुणे यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाव्दारे/ व्यक्तीश: विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती देता येत नाही, त्याबाबतचे स्पष्ट कारण नमुद करुन अपिलार्थीस लेखी कळवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी ग्रामसेवक , ग्रामपंचायत कार्यालय बकोरी ता. हवेली, जि. पुणे यांनी माहिती अर्जावर काहीही कार्यवाही केलेली नाही, अपिल आदेशाची अंमलबजावणी केली नाही, त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरूध्द अधिनियमाच्या कलम २०(१)नुसार कारवाई का करणेत येवू नये? याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना आदेशित करण्यात येते की, यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५)/सहा, दि.०१/१२/२०१५ नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता विद्यमान जन माहिती अधिकारी द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.(२२२/१५) /सहा, दिनांक ०१/१२/२०१५ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

या निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते खंडपीठ

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. 5651/2024 दिनांक - 14/10/2024.

प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाही साठी अग्रेषित-

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे

सदरचा आदेश सांबंधितास बजावून पोच आयोगास सादर करावी.